स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्यकार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावकक्र. : व.वि.श.म./मा.तं.//2026**
दि.०९/०८/२०२६

घनकचरा व्यवस्थापन विभाग

***महानगरपालिकेमार्फत प्रभाग समिती ‘ए’, ‘बी’ व ‘सी’ कार्यक्षेत्रातील घाऊक कचरा निर्मात्यांसाठीची मार्गदर्शन व जनजागृतीपर बैठक संपन्न***

सन्माननीय महापौर महोदय श्री.अजीव पाटील तसेच सन्माननीय आयुक्त महोदय श्री.पृथ्वीराज बी. पी.(भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या अध्यक्षतेखाली घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या अनुपालनाबाबत प्रभाग समिती ‘ए’ बोळींज, ‘बी’ नालासोपारा, ‘सी’ चंदनसार कार्यक्षेत्रातील घाऊक कचरा निर्माते (Bulk Waste Generators - BWGs) यांचे करिता आयोजित मार्गदर्शनपर बैठक दि.०९ ऑगस्ट २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात संपन्न झाली.

गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी अधिसूचित केलेले घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अंमलात आले असून सदर नियमांमध्ये घाऊक कचरा निर्मात्यांसाठी विस्तारित घाऊक कचरा निर्माते जबाबदारी (Extended Bulk Waste Generator Responsibility - EBWGR) तसेच स्रोतस्तरावर चार प्रकारे कचरा वर्गीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका हद्दीतील गृहनिर्माण संस्था, व्यावसायिक संकुले, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स, मंगल कार्यालये तसेच इतर घाऊक कचरा निर्माते यांच्यासाठी विशेष मार्गदर्शन बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीदरम्यान महानगरपालिकेमार्फत व Centre for Science and Environment (CSE) येथील विशेष वक्त्यांनी Solid Waste Management Rules, 2026 मधील BWGs संबंधी तरतुदी, कर्तव्ये, कचऱ्याचे स्रोतावर वर्गीकरण, ऑन-साइट कचरा प्रक्रिया, कंपोस्टिंग/बायोगॅस तसेच प्रभावी अनुपालनासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन व माहितीपूर्ण सादरीकरण (Presentation) करण्यात आले. बैठकीत उपस्थितांमार्फतही विविध प्रश्न विचारण्यात आले. उपस्थित विशेष वक्त्यांनी यावेळी उपस्थितांच्या सर्व प्रश्नांचे समाधान करीत विविध विषयांवर चर्चाही केली.

बैठकीत मा.अतिरिक्त आयुक्त महोदयांनी घाऊक कचरा निर्माते यांनी (BWGs) घनकचरा व्यवस्थापन नियमांचे काटेकोर पालन करून कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचऱ्याचे व्यवस्थापन व प्रक्रिया करण्यावर भर देण्याचे, तसेच घाऊक कचरा निर्मात्यांनी विशेषतः गृहनिर्माण संस्थांनी अद्याप कचरा वर्गीकरण व प्रक्रिया व्यवस्था सुरू केलेली नाही, त्यांनी ती तातडीने कार्यान्वित करून महानगरपालिकेस आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सदर बैठकीत मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, सन्माननीय नगरसेवक-नगरसेविका, सन्माननीय पदाधिकारी, CSE चे विशेष वक्ते, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व प्रभाग समिती ‘ए’, ‘बी’ व ‘सी’ कार्यक्षेत्रातील विविध श्रेणीत मोडणारे Bulk Waste Generators अर्थात मोठ्या प्रमाणात घनकचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांचे प्रतिनिधी, NGOs उपस्थित होते.

महानगरपालिका घनकचरा विभागामार्फत प्रभाग समिती निहाय टप्प्याटप्प्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घाऊक कचरा निर्मात्यांसाठी मार्गदर्शन व जनजागृतीपर बैठकीचे आयोजन करण्यात येत असून संबंधितांनी या बैठकीस उपस्थित राहून महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.